गोदातीर दि. 15/09/23

# पंजाब येथून वडिलांचा खून करून फरार असलेल्या आरोपीस वजिराबाद पोलिसांनी केली अटक



**नांदेड** –शहरात पाहिजे व फरारी आरोपीचे वाढते प्रमाण तसेच इतर राज्यात गुन्हे करुन नांदेड येथे आश्रय घेत होते. आरोपी पकडण्याच्या सुचना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव यांनी दिल्या आहेत.

सदर आदेशांच्या अनुषंगाने वजीराबाद पोलीस ठाण्याचे निरीक्षक अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराज जमदडे, राजू मुत्येपोड, अंमलदार विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावरे, बालाजी कदम, रमेश सूर्यवंशी, इमरान, भाऊसाहेब राठोड यांनी पंजाब पोलीसांकडून फरार असलेल्या आरोपीतांची माहिती घेवून आरोपीतांचा शोध घेणे सुरु केले.

गुरुवार, दिनांक १४ सप्टेंबर रोजी नकोधर पोलीस ठाणे जि. जालंधर राज्य पंजाब यांच्याकडून माहीती प्राप्त झाली की, पोलीस ठाणे नकोधर जि. जालंधर येथे एका वयोवृद्ध ६८ वर्ष वयाच्या व्यक्तीस त्यांचा मुलगा सतेंद्रसीग हरजीतसींग यांने धारधार शस्त्राने मारून खून करून त्यांच्या बँक खात्यामधुन ५८ हजार रूपये काढून घेवून तो नांदेड येथे गुरुद्वारा परीसरात पळून आला आहे अशी माहिती मिळाली. यावरून वर नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी लंगर साहीब गुरुद्वारा बाजूस नगीना घाट परीसरात सदर आरोपीचा फोटो दाखवून सदर आरोपी बाबत बारकाईने व गोपनीय माहितीदार मार्फत विचारपूस करून आरोपीचा शोध घेत असतांना सदर आरोपी सारखा एक व्यक्ती मिळून आला.

आरोपीला पकडून त्याचे नावे, गाव, पत्ता विचारला असता त्याने आपले नांव सतेंद्रसींग हरजीतसींग (वय ३८ वर्षे व्यवसाय मजुरी राहणार मकान क्र ५५४४ मोहल्ला पुरेवाला कॉलनी रवीदास मंदिराजवळ निकोधर जि. जालंधर असे सांगितले. त्याचे गुन्हे अभिलेख बाबत पंजाब पोलिसांना संपर्क साधून सदर आरोपीसाठी पंजाब पोलिसांचे पथक नांदेड येथे आल्याने त्यास वरिष्ठांना माहिती देवून त्यांच्या आदेशान्वये पंजाब पोलिसांकडे ताबा देण्यात आला असून, पुढील तपास पंजाब पोलीस करीत आहेत.